# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# विधान भवन, मुंबई - ४०००३२

**विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत**
**नोंदणीकृत महिला बचत गटांकडून खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी**

## जाहिर निविदा

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी अधिवेशन सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजीपासून नागपूर येथे सुरु होणार आहे. विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी नोंदणीकृत (Registered) महिला बचत गटांकडून खाद्यपदार्थांचे दर नमूद केलेल्या निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **'प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ४०० ०३२'** अथवा **'शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, विधान भवन, नागपूर'** यांच्याकडे बुधवार, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत पाठवावी. प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्वीकृत अथवा अस्वीकृत करण्याचा अंतिम अधिकार प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घ्यावी. निविदासंदर्भातील अधिक माहितीसाठी कक्ष अधिकारी, ग-१ कक्ष यांच्याशी सपर्क साधण्यात यावा. तसेच या सचिवालयाचे www.mls.org.in हे संकेतस्थळ पहावे.

**दिनांक :- ३० ऑक्टोबर, २०१७**

**विधान भवन,**
**मुंबई / नागपूर**

# विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत नोंदणीकृत महिला बचत गटांकडून खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी जाहीर निविदेचे नियम व अटी

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी अधिवेशन सोमवार दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी पासून नागपूर येथे सुरु होणार आहे. अधिवेशन कालावधीत मा.सदस्यांकरीता खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्याकरीता नोंदणीकृत महिला बचत गटांकडून जाहिर निविदा पद्धतीने निविदा मागविण्यात येत असून त्याबाबतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

(१) जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्तांकडून खाद्यपेय प्रबंधकांनी स्वत:च्या चारित्र्याविषयी, समाज विघातक प्रकरणात सहभागी नसल्याचे तसेच ते पोलीस विभागाकडे नोंदी असलेल्या आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाच्या गंभीर गुन्ह्याची नोंद नसल्याचे अद्ययावत प्रमाणपत्र सादर करावे व ते प्राप्त करण्यास विलंब लागत असल्यास तूर्त यासंदर्भात स्वत:चे शपथपत्र (Affidavit) सादर करावे व प्रमाणपत्र तातडीने प्राप्त करुन घेऊन ते सादर करण्यात यावे. तसेच भागीदार असल्यास सर्व भागीदारांचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र अथवा शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) महिला बचत गटासंदर्भातील नोंदणी बाबतची कागदपत्र.

(३) निविदा सादर करतांना निविदाकार महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे रहिवाशी असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

(४) अन्न व औषधी द्रव्ये (FSSAD) प्रशासन विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(५) महिला बचत गटाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्याबाबतची कागदपत्रे.

(६)निविदा सोबतच्या "परिशिष्ट "अ" मधील दर सूचीमध्ये दिलेल्या तक्त्यात दर भरुन सादर करावेत.

(७) यशस्वी निविदाकारास रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) अनामत रक्कम म्हणून डी.डी. च्या स्वरुपात "कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय" यांच्या नावे जमा करावी लागेल.

(८) सदर निविदा मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ४०० ०३२"** अथवा **"शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, विधान भवन, नागपूर"** यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे (By Regd.AD) किंवा शीघ्र टपालाने (By Speed Post) बुधवार, दिनांक **८ नोव्हेंबर, २०१७** रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत पाठवावी.

# परिशिष्ट "अ"

## निविदेसोबत सादर करावयाची खाद्यपदार्थांची सूची व दर

| अ.क्र. | | पदार्थाचे नाव | दर (रु.) |
|---|---|---|---|
| (१) | | **नाश्ता** | |
| | १. | कांदापोहे | |
| | २. | शिरा / उपमा | |
| | ३. | कांदाभजी / बटाटा भजी / मिर्ची भजी चटणीसह | |
| | ४. | बटाटा वडा (२ नग) चटणीसह | |
| | ५. | साबुदाणा वडा (२ नग) दहीसह | |
| | ६. | शेंगदाणा लाडू | |
| | ७. | स्वीट कचोरी दहीसह | |
| | ८. | फराळी चिवडा | |
| | ९. | वेफर्स | |
| (२) | | **झुनका भाकर** | |
| (३) | | **पुरी भाजी चटणीसह** | |
| (४) | | **वेज पुलाव सह करी, कोशिंबीर, पापड** | |
| (५) | | **थाली** | |
| | अ) | **शाकाहारी थाली** (४ चपाती, १ पातळ उसळ / भाजी, १ सुकी भाजी, डाळ-राईस, कोशिंबीर, लोणचे, पापड, दही / ताक) | |
| | ब) | **मासांहारी थाली** | |
| | १. | चिकन थाली, कोकम कडी किंवा ताक | |
| | २. | मटण थाली, कोकम कडी किंवा ताक | |
| | ३. | अंडा करी थाली | |
| (६) | | **चहा** | |
| (७) | | **कॉफी** | |
| (८) | | **दही किंवा ताक** | |
| (९) | | **बिसलरी बॉटल (पाणी)** | |

**निविदाकाराची सही व शिक्का**